ePaper
मुलींना मोफत उच्च शिक्षण योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा: चंद्रकांत पाटील

वर्ष - 8 । अंक - 310 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

www.mahaenews.com । गुरुवार, दि. 19 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



## आतील पानांत


- मुशफिकुरने मोडला सचिनचा रेकॉर्ड!
- पंजाबचा फलंदाज अमेरिकेत गरजला!
- मी काय करेन, कोणालाही माहिती नाही
- आजकाल तुम्ही ट्विटरवर भांडता?


## शिवसेनेने पुन्हा ठाकरे गटाला डिवचले

# ‘हिंदुत्व आहे गाठीशी, महाराष्ट्र उभा पाठीशी’

### वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला शिवसेना शिंदे गटाकडून पोस्ट करण्यात आलेल्या व्यंगचित्राची जोरदार चर्चा

। मुंबई / पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचा वर्धापनदिन आज, गुरुवारी 19 जून रोजी वरळीत साजरा केला जाणार आहे. या वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने आपली भविष्यातील राजकारणाची दिशा स्पष्ट केली असून, हिंदुत्व आहे गाठीशी, महाराष्ट्र उभा पाठीशी, असे सांगत वाघासोबत चालणारे एकनाथ शिंदे यांचे व्यंगचित्र समाज माध्यमावर पोस्ट केले आहे. शिवसेनेला विधानसभा निवडणुकीत भरघोस मते मिळाली. तर उद्धव ठाकरे गटाला अवघ्या काही जागांवर समाधान मानावे लागले. त्यामुळे व्यंगचित्रांच्या माध्यमातून ठाकरे गटाला डिवचण्याचा हा प्रयत्न असल्याचं बोललं जात आहे.**




शिवसेनेचा वर्धापन दिन गुरूवारी साजरा केला जाणार आहे. त्या निमित्त वरळीतील एनएससीआय डोम येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेचे महत्त्वाचे नेते शिवसैनिकांना संबोधित करणार आहेत. आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गट आणि शिवसेना ठाकरे गट दोन्ही शिवसेनेसाठी हा दिवस महत्त्वाचा असणार आहे. राज्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या भाषणांकडे सर्वांचं लक्षण असणार आहे.

मात्र त्यापूर्वी शिवसेना शिंदे गटाकडून एक व्यंगचित्र सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आलं आहे. शिवसेनेच्या वतीने व्यंगचित्राच्या माध्यमातून शिवसेनेची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. हिंदुत्व आहे गाठीशी, महाराष्ट्र उभा पाठीशी, असा मजकूर त्यावर नमूद करण्यात आला आहे. सोबतच शिवसेनेचा वाघ आणि सोबतच चालणारे एकनाथ शिंदे यांच्या खांद्यावर भगवा ध्वज तसेच पाठीशी महाराष्ट्र दाखवण्यात आला आहे. विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर महाराष्ट्राची जनता शिवसेनेच्या पाठीशी उभी असल्याचे सिद्ध झाले आहे, असे एकनाथ शिंदे वारंवार आपल्या भाषणात सांगत असतात. तोच आशय घेऊन हे व्यंगचित्र पोस्ट करण्यात आलं आहे. दरम्यान उद्धव ठाकरे यांनी हिंदुत्व सोडले असल्याचा आरोपही वारंवार शिवसेना शिंदे गटाकडून करण्यात येतो. त्यामुळेच उद्धव ठाकरे यांना डिवचण्यासाठी शिवसेनेकडून हे व्यंगचित्र पोस्ट करण्यात आल्याची चर्चा आहे.

### पक्षाच्या वर्धापनदिनीच ठाकरे गटात मोठा भूकंप?

पुढील काही महिन्यांमध्ये राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी आणि महायुतीमधील घटक पक्षांनी तयारीला सुरुवात केली आहे. आज शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीमध्ये ‘मातोश्री’वर माजी नगरसेवकांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठीकीनंतर आता शिवसेना ठाकरे गटातून मोठी बातमी समोर येत आहे. आज उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील माजी नगरसेवकांची बैठक बोलावल्यानंतर देखील ठाकरेंचे 3 माजी नगरसेवक शिवसेना शिंदे गटाच्या संपर्कात असल्याची माहिती समोर येत आहे. या नगरसेवकांसोबत गेल्या काही दिवसांपासून शिवसेना शिंदे गटाची चर्चा सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. उद्या शिवसेनेचा वर्धापन दिन आहे, वर्धापन दिनाच्या दिवशीच हे नगरसेवक शिवसेना शिंदे गटात प्रवेश करण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या दिवशीच ठाकरे गटाला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. आज झालेल्या बैठकीत उद्धव ठाकरे यांनी सर्व माजी नगरसेवकांना सोबत राहून पक्ष वाढवण्यासाठी काम करा असं आवाहन केलं आहे. येणाऱ्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत मी सर्वतोपरी तुमच्यासोबत उभा असेल असं देखील उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

### मनसेसोबत युतीबाबत चर्चा

दरम्यान आज उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीमध्ये शिवसेना ठाकरे गटाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला मुंबईतील पक्षाचे सर्व माजी नगरसेवक उपस्थितीत होते. या बैठकीमध्ये उद्धव ठाकरे यांनी आपल्या नगरसेवकांना मनसेबाबत युतीसंदर्भात विचारणा केल्याची माहिती समोर येत आहे. या माजी नगरसेवकांनी देखील मनसेसोबतच्या युतीसाठी अनुकूल वातावरण असल्याचं उद्धव ठाकरे यांना सांगितल्याचं बोललं जात आहे.

# भारतीय भाषेचा तिरस्कार योग्य नाही

## कोणतीही भारतीय भाषा शिकण्याचा पर्याय : मुख्यमंत्री

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंदी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय मागे घेण्यात आला आहे. आता कोणतीही तिसरी भारतीय भाषा विद्यार्थ्यांना शिकता येईल. या धोरणात मातृभाषा अनिवार्य असून, अन्य दोन भाषांपैकी एक भारतीय भाषा असली पाहिजे. इंग्रजीचा पुरस्कार केला जातो. पण, भारतीय भाषेचा तिरस्कार करणे योग्य नाही.**



तिसऱ्या भाषेत हिंदीची अनिवार्यता काढण्याचा आणि कोणतीही भारतीय भाषा शिकण्याचा पर्याय विद्यार्थ्यांना देण्यात आला आहे,' असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने पुणे-आळंदी पालखी मार्गावर वडमुखवाडी येथे उभारण्यात आलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत नामदेव महाराज भेटीचे समूहशिल्प व संतसृष्टीचे लोकार्पण बुधवारी फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते माध्यमांशी बोलत होते.फडणवीस म्हणाले, 'हिंदीचे शिक्षक मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत असल्याने तिसऱ्या भारतीय भाषेत सुरुवातीला हिंदी भाषा अनिवार्य केली होती. मंगळवारी प्रसिद्ध केलेल्या शासनादेशात अनिवार्यतेचा निर्णय मागे घेण्यात आला आहे. आता कोणतीही तिसरी भारतीय भाषा शिकता येईल. नवीन शैक्षणिक धोरणात मातृभाषा अनिवार्य आहे. त्या व्यतिरिक्त दोन भाषा आणि त्यातील एक भारतीय भाषा असली पाहिजे. त्यासाठी २० विद्यार्थी असतील, तर शिक्षक उपलब्ध करून देण्यात येईल. ऑनलाइन पद्धतीनेही प्रशिक्षण दिले जाईल.'भारतीय भाषा इंग्रजीपेक्षा चांगल्या आहेत. इंग्रजी व्यवहार भाषा झाली आहे. नवीन शैक्षणिक धोरणाने मराठीला ज्ञान आणि अर्थकारणाची भाषा बनण्याचा मार्ग खुला केला आहे. अभियांत्रिकी, एमबीए, वैद्यकीय शिक्षण मराठीत शिकविले जात आहे. त्यामुळे असा वाद योग्य नाही. कोणत्याही प्रकारच्या शाळेत मराठी अनिवार्य आहे. मराठीला पर्याय नसून, हिंदीला पर्याय आहेत,' असेही ते म्हणाले. दोनच भाषा असाव्यात, तिसरी भाषा लादू नका, असा राज ठाकरे यांचा आग्रह आहे. केंद्र सरकारने विचारपूर्वक देशासाठी तीन भाषांचे सूत्र आणले आहे. देशभरातील तज्ज्ञांनी हे धोरण तयार केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र दोन भाषांच्या सूत्रावर जाऊ शकत नाही, याबाबत ठाकरे यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला जात आहे,' असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.नाशिकमधील शिवसेना ठाकरे गटाचे सुधाकर बडगुजर यांच्यावर टीका करून नीतेश राणे यांनी चित्रफीत प्रसिद्ध केली होती, हे खरे आहे. त्यानंतर दाखल गुन्ह्याची चौकशी झाली. चौकशीअंती बडगुजर यांच्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. त्यांनी भाजपविरोधात निवडणूक लढवली. निवडणुकीनंतर त्यांनी पक्षात येण्याची इच्छा दाखवली. पक्षात येणाऱ्याचे स्वागत केले जाते.वागण्याची पद्धत बाजूला ठेवून भाजपच्या नीती, नियमाने वागावे. पक्षप्रवेशाची जबाबदारी गिरीश महाजन यांच्यावर होती. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना सकाळी कल्पना नव्हती.

### 'बडगुजरांवर कोणतीही कारवाई नाही'

प्रवेशाची माहिती मिळताच बावनकुळे हजर होते. संवादाचा अभाव राहिला, विरोध कोणाचा नव्हता. स्थानिक स्तरावर विरोध झाला. पक्ष वाढवायचा असल्याचे सांगून त्यांचीही समजूत काढण्यात आली,' असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.भाजपसोबत जाणाऱ्या संधिसाधूंसोबत जाणार नसल्याचे शरद पवार यांचे विधान मी ऐकले नाही. त्यात मला पडायचे नाही. मला 'बेगानी शादी में अब्दुल्ला दीवाना' व्हायचे नाही.पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने पुणे-आळंदी पालखी मार्गावर वडमुखवाडी येथे उभारण्यात आलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत नामदेव महाराज भेटीचे समूहशिल्प व संतसृष्टीचे लोकार्पण बुधवारी फडणवीस यांच्या हस्ते झाले.

# भंडारा डोंगर पायथ्याला 'कॉरिडॉर' विकसित करणार

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आश्वासन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**श्री क्षेत्र भंडारा डोंगर पायथ्याशी असलेली सव्वाशे एकर गायरान जमीन ताब्यात घेऊन वारकऱ्यांच्या सोयीसाठी सरकारतर्फे येथे कॉरिडॉर विकसित केला जाईल. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करून याकामी सर्वतोपरी मदत केली जाईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले.**



श्री क्षेत्र देहू येथील संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान होण्याच्या पार्श्वभूमीवर बुधवारी सकाळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी श्री क्षेत्र भंडारा डोंगर येथे सदिच्छा भेट दिली. श्री विठ्ठल रखुमाई तुकाराम महाराज भंडारा डोंगर ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद पाटील यांनी ट्रस्टच्या वतीने पवार यांचे स्वागत केले. तुकोबांची पगडी घालून सत्कार करण्यात आला. संत तुकोबारायांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून पवार यांनी दर्शन घेतले. मावळचे आमदार सुनील शेळके, माउली महाराज कदम, ट्रस्टचे विश्वस्त रामभाऊ कराळे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, विठ्ठलराव शिंदे, भाजपचे तालुकाध्यक्ष रवींद्र भेगडे, प्रकाश सोमवंशी, प्रशांत भागवत यांच्यासह ट्रस्टचे विश्वस्त आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

भंडारा डोंगरावर दीड तास थांबून उपमुख्यमंत्री पवार यांनी मंदिर बांधकामाची सखोल पाहणी करून कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. नियोजित मंदिर परिसराचे नियोजन, रचना, श्रद्धास्थळ म्हणून वारकरी, भाविकांसाठी असणाऱ्या सोयीसुविधा आणि भावी पिढ्यांसाठी संत साहित्य व आध्यात्मिक वारसा जपण्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या कार्याचे तोंडभरून कौतुक केले. संत तुकाराम महाराजांचे कार्य, विचार आणि वारसा अखंडपणे टिकवणे हे सर्वांचे कर्तव्य असल्याचे सांगतानाच मंदिराची कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण होण्यासाठी आवश्यक त्या सूचना पवार यांनी संबंधितांना दिल्या.

पवार म्हणाले, "कुठल्याही शासकीय मदतीशिवाय वारकरी आणि सर्वसामान्यांच्या योगदानातून श्री क्षेत्र भंडारा डोंगरावर उभारले जात असलेले अप्रतिम आणि दिव्य मंदिर हजारो वर्षे टिकू शकेल.

### मंदिर बांधकामासाठी सर्वतोपरी मदत करणार

अयोध्येतील श्री राम मंदिरानंतर वारकरी संप्रदायाचे हे आकर्षक असणार आहे. संत तुकाराम महाराजांचे चरित्र हे भक्ती, वैराग्य आणि सामाजिक समतेचा मूर्तिमंत आदर्श असून, तुकोबांचे मंदिर भाविकांसाठी धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक केंद्र ठरणार आहे. मंदिर बांधकामासाठी सर्वतोपरी मदत करणार असल्याचा शब्द पवार यांनी विश्वस्त समितीला दिला. ट्रस्टचे अध्यक्ष काशीद यांनी मंदिर परिसरात सुरू असलेल्या विविध विकास कामांची माहिती पवार यांना दिली.

## चऱ्होलीची टीपी स्कीम रद्दच्या प्रस्तावाला मान्यता

# मुख्यमंत्र्यांचा आदेश अन् प्रशासनाची “तालीम”

### मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार प्रशासक शेखर सिंह यांची कार्यवाही

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार बुधवारी पिंपरी- चिंचवड महापालिकेच्या प्रशासनाने मौजे चऱ्होली येथील TP SCHEME बाबतच्या प्रस्तावाला मान्यता दिली. महानगरपालिका प्रशासनाने लादलेली TP SCHEM अखेर रद्द झाली असून, ग्रामस्थ तसेच भूमिपुत्रांना यामुळे एक प्रकारे दिलासा मिळाला आहे.**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने चिखली आणि मौजे चऱ्होली येथे नवीन नगर योजना प्रस्तावित ठेवली. या TP scheme संदर्भात मोठा रोष पाहायला मिळाला. ग्रामस्थ भूमिपुत्र यांनी “करो या मरो” असा पवित्र घेत टीपी स्कीम बाबत विरोध दर्शवला होता.

भूमिपुत्रांचा विरोध लक्षात घेत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी या संदर्भात आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या समवेत बैठक घेतली होती. यामध्ये आमदारांनी ग्रामस्थ तसेच भूमिपुत्रांच्या भावना, या परिसरात आतापर्यंत झालेले भूसंपादन त्यामुळे भूमिपुत्रांवर झालेला अन्याय सविस्तरपणे मांडला होता. मात्र, दरम्यानच्या काळात चिखली येथील टीपी स्कीम रद्द करण्यात आली. तर दुसरीकडे मौजे चऱ्होली येथील टीपी स्कीमचा निर्णय स्थगिती असा ठेवलेला होता. या विरोधात ग्रामस्थ भूमिपुत्र यांचा प्रचंड रोष होता. आज महापालिका विविध विकासकामांचे उद्घाटन आणि लोकार्पण करण्यासाठी आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर आमदार महेश लांडगे यांनी हा मुद्दा छेडला. भूमिपुत्रांवर भूसंपादनाच्या बाबत झालेला अन्याय त्यांनी स्पष्टपणे मांडला. याची दखल घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यासपीठावरूनच प्रशासनाला ही टीपी स्कीम रद्द करण्याचे आदेश दिले. तसेच, भूमिपुत्रांना डावलून कोणताही विकास आम्हाला करायचा नाही, असे देखील स्पष्टपणे सांगितले.

#### चऱ्होली टीपी स्कीम अखेर रद्द...

भूमिपुत्र ग्रामस्थ यांचा टीपी स्कीम बाबत वाढलेला रोष लक्षात घेता पिंपरी-चिंचवड महानगरपालिका नगररचना विभागाने बुधवारी सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्तावित टीपी स्कीम रद्द करावी असा प्रस्ताव प्रशासक आयुक्त शेखर सिंह यांच्या समोर ठेवला होता. आयुक्तांनी मुख्यमंत्र्यांनी केलेल्या सूचनेनुसार अखेर चऱ्होली टीपी स्कीम रद्द केली आहे.

“ मौजे चिखली आणि चऱ्होलीत महानगरपालिका प्रशासनाने लादलेली TP Schem रद्द करण्याबाबत आम्ही संघर्षाची तयारी ठेवली. राज्य शासनाशी देखील पाठपुरावा केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोर हा विषय मांडला. भूमिपुत्रांवर कोणताही अन्याय होऊ देणार नाही ही माझी ग्वाही होती तो ‘शब्द’ मी आज पाळला आहे. मौजे चिखली आणि चऱ्होली तील टीपी स्कीम रद्द करण्यात आली आहे.

**-महेश लांडगे;** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे देहूतून प्रस्थान

### पुण्य उभे राहो आता। संताचे या कारण।। पंढरीच्या लागा वाटे। सखा भेटे विठ्ठल।।

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**टाळ-मृदंगाचा गजर...विणेचा झंकार...व तुकोबा-तुकोबा नामाचा जयघोष...अशा भारलेल्या वातावरणात व भक्तीच्या कल्लोळात भागवत धर्माचे प्रतिक असलेली भगवी पताका नाचवत श्री क्षेत्र देहूगावातून जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज आषाढी वारीच्या पालखी सोहळ्याने पंढरपूरच्या दिशेने बुधवारी प्रस्थान ठेवले. प्रस्थानाचा हा सोहळा ‘याची देही याची डोळा’ साठवण्यासाठी लाखो वैष्णवांनी इंद्रायणीकाठी दाटी केली होती. इंद्रायणीचा अवघा परिसर वारकरीमय झाला होता. यंदा पालखी सोहळ्याचे ३४० वे वर्ष आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तुकोबांच्या पादुकांची पूजा करण्यात आली.**



टाळ-मृदुंगाच्या निनादात वारकऱ्यांचा अखंड हरीनामाचा गजर देहुनगरीत दुदुमत होता. विठूनामाचा जयघोष करत फुगडी खेळत भागवतधर्मीय भक्तीरसात चिंब होत होते. हरिनामाचा गजर वारकऱ्यांचा उत्साह दुणावत होता. विठ्ठलमय झालेले वारकरी जयघोषात नाचत होते. इंद्रायणीच्या प्रवाहानेही या सुरात आपले सूर मिसळले. अवघा आसमंत विठ्ठलमय झाला. हजारो भाविकांनी तुकोबांच्या पादुकांवर माथा ठेवत, तर काहींनी मनोभावे नमस्कार करीत तुकोबांच्या चरणी आपली सेवा रुजू केली. बुधवारी पहाटेच घंटानादाने देहूनगरी जागी झाली. पहाटे पाच वाजता श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिरात संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. संत तुकाराम महाराज शिळा मंदिरात गणेश महाराज मोरे, विक्रमसिंह महाराज मोरे, लक्ष्मण महाराज मोरे यांच्या हस्ते महाअभिषेक झाला. विठ्ठल-रूक्मिणी मातेची महापूजा करण्यात आली. पालखी सोहळ्याचे जनक तपोनिधी नारायण महाराज समाधी मंदिरात उमेश महाराज मोरे यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली.

सकाळी दहा वाजता देहूकर महाराज यांचे पालखी प्रस्थान सोहळा सप्ताहातील काल्याचे कीर्तन झाले. त्यानंतर इनामदार वाड्यात तुकोबांच्या पादुकांची विधीवत महापूजा करण्यात आली. महापूजा सुरू असताना मंदिर आणि परिसरात विठोबा-तुकारामाच्या जयघोषाचा आवाज टिपेला पोचला. भजन-कीर्तनाचा अखंड नाद, साऱ्यांनीच भान हरपून धरलेला फुगड्यांचा फेर, टाळ-मृदुंगांचा लयबद्ध आवाज आणि बरसणारा पाऊस अशा भारलेल्या वातावरणात पालखीचे मानकरी म्हसलेकर यांनी डोक्यावर पादुका घेऊन संबळ, टाळमृदंग आणि तुतारी या वाद्यांसह वाजतगाजत मुख्य मंदिरातील भजनी मंडपात आणल्या. त्यानंतर पोलिसांनी देऊळवाड्यात मानाच्या दिंड्या, फडकरी, विणेकरी यांनी आपआपल्या क्रमांकावर सोडण्यास सुरुवात केली.

पालखी प्रस्थानच्या कार्यक्रमाला दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास प्रारंभ झाला. चांदीच्या सिंहासनावर, चांदीच्या ताटात चांदीच्या पादुकांना अभिषेक करण्यात आला. परंपरेनुसार ज्येष्ठ वारकरी मान्यवरांच्या हस्ते पादुकांची पूजा करण्यात आली.


#### आज आकुर्डीत मुक्काम

संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे गुरूवारी इनामदारवाड्यातून आकुर्डीकडे मार्गस्थ होईल. अनगडशाह बाबा यांच्या दर्गाजवळ अभंग, आरती होईल, तसेच चिंचोली पादुका येथे अभंग, आरती होईल. पालखी सोहळा रात्री आकुर्डीतील विठ्ठल मंदिरात मुक्काम करणार आहे. देऊळवाडा आणि परिसरात चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

#### दिंड्या थांबविल्यामुळे वारकरी आक्रमक

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ताफा आल्याने मंदिरात सोडण्यात येणाऱ्या दिंड्यांना थांबविले. अश्वालाही आत सोडले नव्हते. त्यामुळे वारकरी आक्रमक झाले. पोलिसांचे सुरक्षाकडे तोडून मंदिरामध्ये जाण्याचा प्रयत्न केला. त्यांना पोलिसांनी रोखले. त्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रकारांनी विचारले असता एकावेळी सर्वांना सोडले तर गोंधळ होईल. त्यामुळे टप्प्याटप्प्याने वारकऱ्यांना मंदिरात सोडले. वारकऱ्यांची सुरक्षा महत्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### परमार्थात गुप्ततेची जरूरी असते.

वासनेच्या तावडीतून सुटणे फार कठीण आहे. कारण वासनेच्या पोटीच प्राणी जन्माला येत असतो. त्या वासनेला जिंकणे, म्हणजे आपण मरून जाण्याइतके कठीण आहे. वासनेच्या पोटी जन्म आणि जन्मानंतर अहंकार, ह्या जोडप्यापोटी कामक्रोधादि विकार जन्माला येतात. या जोडप्याचे वैशिष्ट्य असे की, त्यामध्ये बायको नवऱ्यापेक्षा वडील असते; कारण आधी वासना आणि त्यातून पुढे अहंकार. भगवंताजवळ ‘ वास ’ ठेवला तरच वासना नष्ट होते. प्रपंच मुळात चांगलाही नाही आणि वाईटही नाही. प्रपंचातली वासना बाहेर काढणे, याचेच नाव परमार्थ. प्रपंचात प्रसिद्धीची जरूरी वाटते. त्याच्या उलट परमार्थात गुप्ततेची जरूरी लागते. समजा, एखाद्या बाईने दागिने हवेत म्हणून नवऱ्याजवळ हट्ट धरला, आणि नवऱ्याने तिला हवे असलेले सर्व दागिने देण्याचे कबूल केले; पण अट अशी घातली की, जेव्हा दागिने अंगावर घालायचे असतील त्या वेळी ते घालून खोलीची दारेखिडक्या बंद करून आत बसले पाहिजे. अशी अट पाळून कोणती बाई दागिने घालायला कबूल होईल ? कारण दागिने लोकांनी पाहण्यातच तिला समाधान आहे. ही झाली प्रपंचातली रीत. परमार्थात याच्या उलट गुप्ततेची गरज आहे. आपली साधना कोणाच्याही नजरेत न येईल अशी खबरदारी घ्यावी; कारण परमार्थाला दृष्ट फार लवकर लागते. ती केवळ इतर लोकांचीच लागते असे नसून, आपली स्वत:चीसुद्धा लागण्याचा फार संभव असतो. म्हणून परमार्थात गुप्तता असावी; आणि आपल्या हातून जे साधन होते आहे, ते सद्‌गुरू किंवा परमात्मा यांच्या कृपेनेच माझ्याकडून करवून घेतले जात आहे, ही जाणीव ठेवावी. आजारी माणसाने नुसते पडून रहावे, पण औषध मात्र नियमाने घ्यावे. बाकीच्या गोष्टी इतर लोक करतात; औषध मात्र आपण स्वत:च घेतले पाहिजे. एखादा मोठा राजा जरी झाला तरी कडू औषध दासीला देऊन काही त्याचा रोग बरा होत नाही; त्याचप्रमाणे, परमार्थात भगवंताचे स्मरण ठेवण्याचे काम आपल्या स्वत:लाच करायला पाहिजे. उगीच कुणाच्या नादी लागू नये. परमार्थ म्हणजे काय करायला पाहिजे हे नीट समजावून घ्या आणि मग त्या मार्गाने जा. कोणाला फसू नका, कारण स्वत: फसणे हे जगाला फसविण्याइतकेच पाप आहे. ज्याचा प्रपंचात पाठीराखा परमात्मा आहे, त्याचा तो प्रपंचच परमार्थ होतो. उलट ज्याच्या पाठीराखा अभिमान आहे, त्याचा परमार्थदेखील प्रपंचच म्हटला पाहिजे.

बोधवचन:- बाहेरून प्रपंची दिसावे पण आत मात्र परमार्थी असावे. ही खरी कला होय.



‘स्टेट’मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# ‘भाजपा’ चं बदलतं स्वरूप..
# Party with a Difference!

**उद्धव ठाकरे गटातून हकालपट्टी झालेले नाशिकचे एक मोठे प्रस्थ, ‘व्हाईट कॉलर’ गुन्हेगार सुधाकर बडगुजर यांना भाजपाने मोठ्या दिमाखात प्रवेश दिला आणि पायघड्या घालून त्यांचे स्वागत केले. एक दोन नव्हे तर तब्बल २९ गुन्हे दाखल असणाऱ्या बडगुजर यांना पक्षात घेण्याची एवढी घाई कशासाठी? हा खरा प्रश्न आहे. त्याचबरोबर जो कोणी येण्यास तयार आहे, त्याचा इतिहास न पाहता त्याला पक्षात घेणे कितपत योग्य आहे ? अशा बेछूट आणि जुन्या कार्यकर्त्यांची पर्वा न करता घेतलेल्या निर्णयांचा फटका भाजपाला निश्चित बसणार आहे.. गुंड आणि गुन्हेगारांना पक्षात घेणे, म्हणजेच ‘पार्टी वुईथ अ डिफरन्स’ म्हणायचे का ?**



### अजित पवारांपासून सुरुवात..

थोडं इतिहासात डोकावू या.. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे त्यावेळचे नेते अजित पवार यांच्यावर भर जाहीर सभेमध्ये जोरदार प्रहार केला होता. ७० हजार कोटीचा घोटाळा अजितदादांनी केल्याचा तो आरोप होता. त्यानंतर लगेच अजितदादांनी भाजपाचा हात पकडला आणि थेट उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. ज्यांच्या ज्यांच्यावर आरोप होते किंवा आहेत, असे राष्ट्रवादी काँग्रेसमधले झाडून सारे नेते अजितदादांबरोबर मंत्रीपदे बळकावून बसले. भाजपाच्या अनेक ज्येष्ठ नेत्यांना यावेळी हात चोळत बसावे लागले, तो भाग वेगळा!

### भाजपाचे वॉशिंग मशीन जोरात..

कोणत्याही गुन्हेगारांने यावे आणि ‘भाजपा’ने त्याला वॉशिंग मशीन मध्ये टाकावे आणि स्वच्छ शुद्ध करून पक्षात मानाचे स्थान द्यावे, अशी परिस्थिती आली आहे. पक्षांमध्ये वर्षानुवर्षे सतरंज्या उचलणाऱ्यांची भूमिका पुन्हा तीच राहिली आहे. आज, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभोवताली जी मंडळी वावरताना दिसतात, ते चेहरे पाहा.. झाडून सगळे नॉन-बीजेपी आहेत!

### काहीही करा.. गुन्हे माफ होणार!

अनेक खून केलेले गुन्हेगार, भ्रष्टाचार केलेले गुंड किंवा समाजामध्ये दादागिरी करून प्रचंड संपत्ती लाटलेले ‘सो कॉल्ड’ व्हाईट कॉलर राजकारणी यांचे मात्र भाजपाच्या ‘आओ जाओ घर तुम्हारा’ या भूमिकेमुळे चांगलेच फावले आहे. एकदा भाजपामध्ये घुसलो, की चौकशीचे लचांड संपले, अशी काहीतरी भावना या गुन्हेगारांची झाली आहे, हे भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांच्या लक्षात येत नाही का?

### घाबरवून सोडा, हीच नीती!

ज्यांच्यावर भारतीय जनता पार्टीचे नेते पुराव्यानिशी आरोप करतात, ते जनतेच्या मनावर ठसलेले असतात.अशाच गुंडांना काही महिन्यात लाल पायघड्या घालून पक्षात समाविष्ट करून घेतले जाते, याला काय म्हणायचे? किरीट सोमय्या, नितेश राणे, आशिष शेलार, प्रसाद लाड यांची एकमेव भूमिका हीच असते की आरोपाची कागदपत्रे घेऊन एखाद्याला पूर्णपणे जेरीस आणायचे.. पुढील काम प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, रवींद्र चव्हाण किंवा गिरीश महाजन हे पूर्ण करतातच ! बकरा जाळ्यात पकडायचा आणि भाजपच्या दावणीला आणून बांधायचा!

### भाजपाच्या विद्यमान नेत्यांचे काय?

आणखी एक चिंताजनक मुद्दा मांडावासा वाटतो. असे तथाकथित गुंड किंवा गुन्हेगार ज्या भागातून आलेले आहेत, त्या भागातील मंत्री किंवा भाजपाचे विद्यमान आमदार किंवा बुजुर्ग व्यक्ती यांच्या भावनेची कदर न करता, त्यांना काहीही न विचारता बिनधास्तपणे अशा गुन्हेगारांना प्रवेश दिला जातो. हेच गुन्हेगार पुन्हा आपल्या भागात जाऊन विरोध करणाऱ्या भाजपाच्या प्रतिनिधींना दिवसात नसतील का, याचासुद्धा विचार होत नसणार !

### खरोखर असा पक्ष होणे नाही..

भाजपाची टॅगलाईन आहे ‘अ पार्टी वुईथ अ डिफरन्स’ म्हणजेच इतरांपेक्षा वेगळा पक्ष.. त्या टॅगलाईनचा आत्ता उलगडा होत आहे. काँग्रेस, समाजवादी, तृणमूल काँग्रेस, जनता दल, द्रमुक या पक्षांना जे जमले नाही, ते भाजपाने करून दाखवले, असे तर त्यांच्या नेत्यांना म्हणायचे नाही ना? तुम्ही गुन्हेगारांना जवळ केले नाही, बघा आम्ही नुसते जवळ केले नाही तर त्याला मंत्रीपद पण दिले, असा संदेश भाजपाला द्यावासा वाटतो का? इतर पक्षातून हाकलून दिलेले असे समाजघातक राजकारणी स्वच्छ करून आणि शुद्ध करून भाजपावाले पक्षात घेतील असे कधी वाटले नव्हते !

### मधुकर बडगुजर चे कारनामे..

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने हाकलून दिलेले आणि समाजाने जवळजवळ वाळीत टाकलेले एक व्यक्तिमत्व म्हणजे सुधाकर बडगुजर ! या बडगुजरनी बावनकुळे आणि रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत मोठ्या दिमाखात भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशाला विरोध करणाऱ्या भाजपच्या नेत्या आमदार सीमा हिरे यांची कुणी दखल सुद्धा घेतली नाही, हा सुद्धा एक गमतीचा भाग! कुख्यात डॉन, देशद्रोही दाऊद इब्राहिम चा साथीदार असलेल्या सलीम कुत्ताबरोबर नाचणारे सुधाकर बडगुजर यांना भाजपाने पवित्र करून घेतले आणि बडगुजर यांच्यावर आरोप करणाऱ्या आपल्याच अनेक नेत्यांची जिरवली !

### जणू संत-महात्म्याचा भाजपा प्रवेश..

बडगुजर यांच्या भाजपा प्रवेशाचे वृत्त सर्वच मराठी वृत्तवाहिन्यांनी दिवसभर चालवले. एखादा संत-महात्मा, महापुरुष, सेलिब्रिटी जणू भाजपामध्ये प्रवेश करत आहे. घरातून निघताना औक्षणापासून कव्हरेज प्रेक्षकांना पहावे लागले. जनतेला आता ‘पेड न्यूज’ कळतातच की! ‘पार्टी विथ अ डिफरन्स’ चा दावा करणाऱ्या भाजपाने कुख्यात गुन्हेगार सलीम कुत्ताबरोबर नाचणारे सुधाकर बडगुजर यांना पक्षात घेतल्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे आणि भाजपा चे अनेक नेते नक्कीच नाराज झाले असणार. पण शेवटी, पतिव्रतेच्या गळ्यात धोंडा, वेश्येला मणिहार दिला जातो हे खरेच!

### आगामी कुंभमेळ्याचे गणित!

नाशिकमध्ये होणारा आगामी कुंभमेळा आणि त्या पार्श्वभूमीवर ठेक्यांच्या टक्केवारीचं गणित तर यामागे नाही ना, अशीही शंका उपस्थित होते. बडगुजर यांच्या नातलगाच्या फार्महाऊस वर दाऊदचा पंटर सलीम कुत्तासोबत पार्टी केल्याचा आणि मद्यधुंद अवस्थेत नाचण्याचा बडगुजर यांच्यावर आरोप आहे. या पार्टीचे फोटो आणि व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते, भाजपाच्या काही नेत्यांनी त्याचे फोटो देखील पत्रकार परिषदांमध्ये दाखवले होते, तेच आता भाजपामध्ये डेरेदाखल झाले आहेत ! कुख्यात सलीम कुत्ता हा १९९३ मध्ये झालेल्या मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपी असून, दाऊद इब्राहिमचा जवळचा साथीदार मानला जातो. बडगुजर यांची महती सांगण्यासाठी एवढेच नाते पुरेसे आहे!

### बडगुजर यांच्यावरील प्रत्यक्ष आरोप !

बडगुजरांवर भ्रष्टाचार आणि फसवणुकीचे तब्बल २९ गुन्हे दाखल आहेत, हे लक्षात घ्या. नाशिक नगरपालिकेतील ठेकेदार म्हणून स्वतःच्या कंपनीसाठी अनुचित आणि अवैधरीत्या करार मिळवण्याचे आरोप आहेत. फसवणूक अन् चालबाजीचे अनेक गुन्हे दाखल आहेत. काही प्रकरणांत त्यांच्या घरावर छापेही टाकण्यात आले होते. ते दोषी पण ठरले आहेत.बडगुजरांवर दाखल असलेले गुन्हे पाहिले तुमचे आमचे डोके चक्रावून जाईल. शासकीय कामकाजात अडथळा आणल्याच्या प्रकरणात, २०२३ मध्ये त्यांना एक वर्ष सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यात आली होती. त्यांच्या विरोधात विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल आहेत त्यातील प्रमुख कलमे 341, 143, 147, 148, 307, 395, 120B, 353, 427, 504, 506 ही असून यापेक्षाही अधिक गुन्हे दाखल आहेत. यात मारहाण, फसवणूक, बेकायदेशीर जमाव, सरकारी कामात अडथळा, अपहरण, चोरी, धमकी, खंडणी अशा प्रकारच्या अनेक भयानक कलमांचा समावेश आहे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# बीसीसीआयला उच्च न्यायालयाचा तडाखा!

## कोची टस्कर्स' संघ मालकांना 538 कोटी देण्याचे आदेश

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) २०११ सालच्या मोसमात एकाच वर्षासाठी खेळलेल्या कोची टस्कर्स केरळ संघाच्या मालकांना ५३८ कोटी रुपये देण्याचा भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला (बीसीसआय) लवादाने दिलेला आदेश उच्च न्यायालयाने योग्य ठरवून बीसीसीआयला तडखा दिला. लवादाच्या निर्णयाविरोधात केलेली याचिका न्यायमूर्ती रियाज छागला यांच्या एकलपीठाने फेटाळून लावली. एवढ्या वर्षांत हा वाद संपुष्टात आला नाही आणि भविष्यात तो संपुष्टात येईल याची शक्यता वाटत नाही. त्यामुळे, लवादने दिलेला निकाल हा योग्यच आहे, असा निर्वाळा देऊन न्यायालयाने लवादाच्या निर्णयात हस्तक्षेपास नकार दिला.**



कराराचे उल्लंघन केल्याची सबब पुढे करून बीसीसीआयने रेंदेव्हू स्पोर्ट्स वर्ल्ड आणि 'कोची क्रिकेट प्रायव्हेट लिमिटेड' यांच्या मालकीच्या कोची टस्कर्स केरळ' संघाला २०११ मध्ये पहिल्याच वर्षी स्पर्धेतून बाहेरचा रस्ता दाखवला होता. संघाने बँक हमी जमा न करणे, स्टेडियम उपलब्ध करून देण्यात असमर्थता, समभागातील वाद आणि सामन्यांची संख्या या गोष्टींची पूर्तता करू न शकल्याचा दावा करून बीसीसीआयच्या नियमन परिषदेने (गव्हर्निंग कौन्सिल) कोची टस्कर्सवर शिस्तभंगाची कारवाई केली होती. या कारवाईला संघाच्या मालकांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.तथापि, न्यायालयाने २०१२ मध्ये हे प्रकरण मध्यस्थीसाठी लवादकडे पाठवले. तीन वर्षे सुनावणी घेतल्यानंतर लवादने २०१५ मध्ये संघ मालकांच्या बाजूने निकाल दिला आणि कोची क्रिकेट प्रायव्हेट लिमिटेडला ३८४ कोटी रुपयांच्या नफ्यातील हिस्सा म्हणून, तर रेंदेव्हू स्पोर्ट्स वर्ल्डला बँक हमी काढून घेतल्याबद्दल १५३ कोटी रुपये देण्याचे आदेश बीसीसीआयला दिले होते. ही रक्कम १८ टक्के वार्षिक व्याजसह देण्याचे लवादाने स्पष्ट केले होते. त्याचप्रमाणे मध्यस्थीसाठी आलेला खर्च बीसीसीआयने देण्याचे आदेश देखील लवादाने दिले होते. लवादच्या निर्णयाला बीसीसीआयने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.कराराचे उल्लंघन केल्याची सबब पुढे करून बीसीसीआयने रेंदेव्हू स्पोर्ट्स वर्ल्ड आणि 'कोची क्रिकेट प्रायव्हेट लिमिटेड' यांच्या मालकीच्या कोची टस्कर्स केरळ' संघाला २०११ मध्ये पहिल्याच वर्षी स्पर्धेतून बाहेरचा रस्ता दाखवला होता. संघाने बँक हमी जमा न करणे, स्टेडियम उपलब्ध करून देण्यात असमर्थता, समभागातील वाद आणि सामन्यांची संख्या या गोष्टींची पूर्तता करू न शकल्याचा दावा करून बीसीसीआयच्या नियमन परिषदेने (गव्हर्निंग कौन्सिल) कोची टस्कर्सवर शिस्तभंगाची कारवाई केली होती. या कारवाईला संघाच्या मालकांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.तथापि, न्यायालयाने २०१२ मध्ये हे प्रकरण मध्यस्थीसाठी लवादकडे पाठवले. तीन वर्षे सुनावणी घेतल्यानंतर लवादने २०१५ मध्ये संघ मालकांच्या बाजूने निकाल दिला आणि कोची क्रिकेट प्रायव्हेट लिमिटेडला ३८४ कोटी रुपयांच्या नफ्यातील हिस्सा म्हणून, तर रेंदेव्हू स्पोर्ट्स वर्ल्डला बँक हमी काढून घेतल्याबद्दल १५३ कोटी रुपये देण्याचे आदेश बीसीसीआयला दिले होते. ही रक्कम १८ टक्के वार्षिक व्याजसह देण्याचे लवादाने स्पष्ट केले होते. त्याचप्रमाणे मध्यस्थीसाठी आलेला खर्च बीसीसीआयने देण्याचे आदेश देखील लवादाने दिले होते. लवादच्या निर्णयाला बीसीसीआयने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

### 153 कोटी रुपये देण्याचे आदेश

संघाने बँक हमी जमा न करणे, स्टेडियम उपलब्ध करून देण्यात असमर्थता, समभागातील वाद आणि सामन्यांची संख्या या गोष्टींची पूर्तता करू न शकल्याचा दावा करून बीसीसीआयच्या नियमन परिषदेने (गव्हर्निंग कौन्सिल) कोची टस्कर्सवर शिस्तभंगाची कारवाई केली होती. या कारवाईला संघाच्या मालकांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.तथापि, न्यायालयाने २०१२ मध्ये हे प्रकरण मध्यस्थीसाठी लवादकडे पाठवले. तीन वर्षे सुनावणी घेतल्यानंतर लवादने २०१५ मध्ये संघ मालकांच्या बाजूने निकाल दिला आणि कोची क्रिकेट प्रायव्हेट लिमिटेडला ३८४ कोटी रुपयांच्या नफ्यातील हिस्सा म्हणून, तर रेंदेव्हू स्पोर्ट्स वर्ल्डला बँक हमी काढून घेतल्याबद्दल १५३ कोटी रुपये देण्याचे आदेश बीसीसीआयला दिले होते.

---

## विमानतळ परिसरातील उंचीच्या नियमांचे उल्लंघन

## अडथळा ठरणाऱ्या इमारतींवर अखेर 12 वर्षांनी कारवाई

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरामधील विमान मार्गातील अडथळे ठरणाऱ्या किंवा उंचीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आठपैकी सात इमारतींच्या बेकायदा बांधकामांवर अखेर १२ वर्षांनी कारवाई करण्यात आल्याचा दावा राज्य सरकारने बुधवारी उच्च न्यायालयात केला. विमानाच्या मार्गातील अडथळे ठरणाऱ्या किंवा उंचीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या इमारतींवर योग्य ती कारवाई न करण्यावरून न्यायालयाने मागील सुनावणीच्या उपनगर जिल्हाधिकाऱ्यांना फटकारले होते.**



अशा इमारतींवर गांभीर्याने कारवाई करा अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जा, असा इशाराही न्यायालयाने उपनगर जिल्हाधिकाऱ्यांना दिला होता. या पार्श्वभूमीवर मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठापुढे बुधवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी सरकारी वकील नेहा भिडे यांनी आधीच्या आदेशाच्या पूर्ततेबाबत उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी दाखल केलेला अहवाल सादर केला. त्याद्वारे जिल्हाधिकाऱ्यांनी उपरोक्त दावा केला. तसेच, आठव्या इमारतीवर कारवाई सुरू आहे. तथापि, या इमारतीला अंशतः संरक्षण असल्याचेही जिल्हाधिकाऱ्यांनी प्रतिज्ञापत्रात म्हटले. अशा बांधकामांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी राज्य सरकारने मुंबई महानगरपालिकेला महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना कायद्यांतर्गत पाडकामाच्या सूचना दिल्या आहेत, असा दावाही प्रतिज्ञापत्रात करण्यात आला आहे.विमानतळ परिसरातील उंचीच्या नियमांचे उल्लंघन करून बांधण्यात आलेल्या बहुमजली इमारतींचा आणि विमान वाहतूक सुरक्षेचा मुद्दा उपस्थित करणारी जनहित याचिका वकील यशवंत शेणॉय यांनी केली होती. तसेच, या अशा इमारतींवर कारवाई करण्याची मागणी केली होती. उंचीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या इमारतींवर गेल्या १२ वर्षांपासून आवश्यक ती कारवाई झाली नाही.

### बेकायदेशीर बांधकामावर कारवाई

विमानतळ परिसरात नवीन बहुमजली इमारती उभ्या राहत आहेत. विमान वाहतूक सुरक्षेचा मुद्दा लक्षात घेता कठोर कारवाईची आवश्यकता शेणॉय यांनी मागील सुनावणीच्या वेळी व्यक्त केली होती. त्याचीही न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्यांना आधीच्या आदेशांची पूर्तता अहवाल सादर करण्याचे आदेश देताना घेतली होती.मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मर्यादितने (एमआयएएल) जुलै २०२२ मध्ये प्रतिज्ञापत्रात दाखल केले होते. त्यात नमूद आठपैकी सात इमारतींवर कारवाई करण्यात आल्याचा दावा जिल्हाधिकाऱ्यांनी प्रतिज्ञापत्रात केला. या संदर्भात नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाला (डीजीसीए) अहवाल सादर केला असून त्यांनीही आदेशाचे पालन केल्याची पुष्टी केल्याचा दावा देखील उपनगर जिल्हाधिकारी राजेंद्र चव्हाण यांनी प्रतिज्ञापत्रात केला.

# मी काय करेन, कोणालाही माहिती नाही!

## इराणवर हल्ले करण्याबाबत ट्रम्प यांची प्रतिक्रिया

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी इराणवर इस्रायलबरोबर हल्ला करणार की इराणच्या अणु पायाभूत सुविधांना लक्ष्य करणार, यावर स्पष्टीकरण देण्यास नकार दिला आहे. ट्रम्प म्हणाले, "मी हल्ला करू शकतो, कदाचित करणारही नाही. मी काय करणार आहे, हे कोणालाही माहिती नाही."**



इराणने संपर्क साधला असला तरी चर्चेसाठी आता खूप उशीर झाला आहे, आणि लवकरच कारवाई करण्याचे त्यांनी संकेत दिले. "पुढील आठवडा मोठा असेल," असेही ते म्हणाले.मागचा आठवडा आणि सध्याची परिस्थिती यामध्ये आता खूप फरक आहे, मी काय करणार आहे हे कोणालाही माहिती नाही", असे डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसबाहेर माध्यमांशी संवाद साधताना म्हटले.यावेळी डोनाल्ड ट्रम्प यांनी असा दावा केला की, इराणने व्हाइट हाऊसमध्ये चर्चा करण्याचा प्रस्ताव दिला होता, परंतु त्यांनी या चर्चेचे स्वरूप किंवा वेळेबाबत तपशीलवार माहिती दिली नाही. यावेळी ट्रम्प यांनी इराणचे वर्णन "पूर्णपणे असुरक्षित, कोणत्याही प्रकारचे हवाई संरक्षण नसलेला" देश असे केले. इराणचे सर्वोच्च नेते अयातोल्ला अली खामेनी यांच्याबद्दल विचारले असता, ट्रम्प यांनी फक्त "शुभेच्छा" असे म्हटले. इराणबद्दल त्यांच्या प्रशासनाचा संयम आता संपला आहे, असेही ट्रम्प यांनी स्पष्ट केले.इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येच्या योजनांवर अमेरिका इस्रायलसोबत काम करत असल्याच्या बातम्या येत असताना, ट्रम्प यांनी यापूर्वी असा दावा केला होता की खामेनी कुठे "लपले आहेत" हे अमेरिकेला नक्की माहित आहे. भविष्यातील हल्ल्या करणार की नाही याचे स्पष्टीकरण देण्यास टाळाटाळ करताना, ट्रम्प यांनी ठामपणे सांगितले की अमेरिका या टप्प्यावर त्यांना "बाहेर काढणार नाही", परंतु अमेरिकेचा संयम "खचत चालला आहे" असा कडक इशारा दिला. त्यांनी इराणच्या "बिनशर्त आत्मसमर्पणाची" मागणी देखील केली आणि म्हटले की इराण कधीही अण्वस्त्रे बाळगू शकत नाही.इस्रायलशी वाढत्या तणावादरम्यान आणि इराणने शरणागती पत्करावी असे अमेरिकेने म्हटल्यानंतर, अयातुल्ला अली खामेनी यांनी बुधवारी ही शक्यता ठामपणे नाकारली आणि इराण कधीही शरणागती पत्करणार नाही असे जाहीर केले. त्यांनी इशारा दिला की अमेरिकन लष्करी हस्तक्षेपाला जोरदार प्रत्युत्तर दिले जाईल, ज्यामुळे अमेरिकेचे "अपरिहार्य नुकसान" होईल.इराणने संपर्क साधला असला तरी चर्चेसाठी आता खूप उशीर झाला आहे, आणि लवकरच कारवाई करण्याचे त्यांनी संकेत दिले. "पुढील आठवडा मोठा असेल," असेही ते म्हणाले.मागचा आठवडा आणि सध्याची परिस्थिती यामध्ये आता खूप फरक आहे, मी काय करणार आहे हे कोणालाही माहिती नाही", असे डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसबाहेर माध्यमांशी संवाद साधताना म्हटले.यावेळी डोनाल्ड ट्रम्प यांनी असा दावा केला की, इराणने व्हाइट हाऊसमध्ये चर्चा करण्याचा प्रस्ताव दिला होता, परंतु त्यांनी या चर्चेचे स्वरूप किंवा वेळेबाबत तपशीलवार माहिती दिली नाही. इराणचे सर्वोच्च नेते अयातोल्ला अली खामेनी यांच्याबद्दल विचारले असता, ट्रम्प यांनी फक्त "शुभेच्छा" असे म्हटले. इराणबद्दल त्यांच्या प्रशासनाचा संयम आता संपला आहे.

### इराणबद्दल संयम आता संपला

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येच्या योजनांवर अमेरिका इस्रायलसोबत काम करत असल्याच्या बातम्या येत असताना, ट्रम्प यांनी यापूर्वी असा दावा केला होता की खामेनी कुठे "लपले आहेत" हे अमेरिकेला नक्की माहित आहे. भविष्यातील हल्ल्या करणार की नाही याचे स्पष्टीकरण देण्यास टाळाटाळ करताना, ट्रम्प यांनी ठामपणे सांगितले की अमेरिका या टप्प्यावर त्यांना "बाहेर काढणार नाही", परंतु अमेरिकेचा संयम "खचत चालला आहे" असा कडक इशारा दिला. त्यांनी इराणच्या "बिनशर्त आत्मसमर्पणाची" मागणी देखील केली आणि म्हटले की इराण कधीही अण्वस्त्रे बाळगू शकत नाही.

# आजकाल तुम्ही ट्विटरवर भांडता?

## मोदींचा गमतीशीर प्रश्न; ट्रम्प-मॅक्रॉन वाद पुन्हा चर्चेत

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यात सुरू झालेला उबदार संवाद काही क्षणांत जागतिक विनोदाच्या क्षणात रूपांतरित झाल्याचे पाहायला मिळाले होते. १७ जून रोजी कॅनडातील कनानास्किस येथे झालेल्या जी-७ शिखर परिषदेच्या दरम्यान मॅक्रॉन यांची भेट घेत असताना, पंतप्रधान मोदींनी सहज टिप्पणी केली, "आजकाल तुम्ही ट्विटरवर भांडत आहात?"**




या विनोदानंतर मॅक्रॉन आणि पंतप्रधान मोदी, दोघेही हसू लागले आणि क्षणभरासाठी भू-राजकीय चर्चेचा सूर विनोदाकडे वळला.दरम्यान, पंतप्रधान मोदी आणि मॅक्रॉन यांच्यातील विनोदी संवादाचा व्हिडिओ सोशल मीडियावर काही तासांतच व्हायरल झाला. यानंतर एक्स, फेसबुक आणि इंस्टाग्रामवरील युजर्सनी पंतप्रधानांच्या या विनोदाचे विश्लेषण करण्यास सुरुवात केली आहे. यावेळी काही युजर्सनी पंतप्रधान मोदी यांची विनोदी टप्पणी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि मॅक्रॉन यांच्यावर केलेल्या टीकेशी जोडली.नियोजित वेळापत्रकाच्या एक दिवस आधीच जी-७ शिखर परिषद सोडून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प मायदेशी परतले होते. यानंतर फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायल आणि इराणमध्ये शस्त्रविरामाचा प्रस्ताव दिला होता, त्यामुळे ते अमेरिकेत परतल्याचे म्हटले होते.फ्रेंच राष्ट्राध्यक्षांच्या या दाव्यावर डोनाल्ड ट्रम्प यांनी संताप व्यक्त केला होता. ट्रुथ सोशलवर लिहिलेल्या पोस्टमध्ये ट्रम्प म्हणाले होते की, "प्रसिद्धी मिळवण्यासाठी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी चुकून असे म्हटले की, मी कॅनडामधील जी-७ शिखर परिषदेतून इस्रायल आणि इराणमधील शस्त्रविरामासाठी अमेरिकेला परतलो आहे. पण, हे चुकीचे आहे. मी आता वॉशिंग्टनला का आलो आहे,परंतु त्याचा शस्त्रविरामाशी निश्चितच काहीही संबंध नाही.

### काय म्हणाले होते मॅक्रॉन?

"तत्पूर्वी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी दावा केला होता की, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी इस्रायल आणि इराणला शस्त्रविरामाचा प्रस्ताव दिला आहे."खरोखरच भेटीचा आणि चर्चेचा प्रस्ताव आहे. विशेषतः शस्त्रविराम करण्यासाठी आणि नंतर व्यापक चर्चा सुरू करण्यासाठी हा प्रस्ताव देण्यात आला होता. आता आपल्याला पहावे लागेल की, दोन्ही देश त्याचे पालन करतील का", असे मॅक्रॉन यांनी जी-७ शिखर परिषदेत पत्रकारांशी बोलताना म्हटले होते.एक्स, फेसबुक आणि इंस्टाग्रामवरील युजर्सनी पंतप्रधानांच्या या विनोदाचे विश्लेषण करण्यास सुरुवात केली आहे. यावेळी काही युजर्सनी पंतप्रधान मोदी यांची विनोदी टप्पणी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि मॅक्रॉन यांच्यावर केलेल्या टीकेशी जोडली.

# शाहरुख खानच्या जबरदस्त लूकने वेधलं लक्ष

गेल्या काही दिवसांपासून बॉलीवूडचा बादशाह अर्थात शाहरुख खानच्या डोळ्यांच्या शस्त्रक्रियेविषयी वृत्त समोर येत आहेत. शाहरुख डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी अमेरिकेला जाणार असल्याचं म्हटलं जात आहे. अशातच शाहरुख खान काल प्रसिद्ध दिग्दर्शक सिद्धार्थ आनंदच्या वाढदिवसाच्या पार्टीत दिसला. यावेळी अभिनेत्याच्या जबरदस्त लूकने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. त्यामुळेच सिद्धार्थ आनंदच्या वाढदिवसाच्या पार्टीतील शाहरुखचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आहेत.'सलाम नमस्ते', 'बचना ऐ हसीनों', 'बँग बँग' आणि 'वॉर' यांसारख्या अनेक चित्रपटाची निर्माती, दिग्दर्शन सिद्धार्थ आनंद केलं आहे. गेल्या वर्षी त्याने शाहरुख खानबरोबर ( SHAH RUKH KHAN ) ॲक्शन-थ्रिलर 'पठाण' चित्रपट केला. बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई करणाऱ्या 'पठाण' चित्रपटाचं दिग्दर्शन सिद्धार्थ आनंदने केलं होतं. काल, ३१ जुलैला सिद्धार्थने ४६वा वाढदिवस साजरा केला. या वाढदिवसासाठी खास शाहरुख खानने उपस्थित लावली होती. मुंबईत वांद्रे येथे सिद्धार्थ आनंदची वाढदिवसाची पार्टी आयोजित करण्यात आली होती. या पार्टीला बॉलीवूडचे अनेक सेलिब्रिटी हजर होते. पण पार्टीतील शाहरुख खानच्या जबरदस्त लूकने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं. शाहरुखचा व्हिडीओ 'इन्स्टंट बॉलीवूड' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. ज्यामध्ये अभिनेता आलिशान गाडीत बसताना दिसत आहे. यावेळी बादशाह ब्लॅक टी-शर्ट, डेनिम जॅकेट आणि ग्रे रंगाच्या कार्गो पँटमध्ये पाहायला मिळत आहे.

# दिशाची बहिणी खुशबू सोशल मीडियावर सक्रिय

आपल्या फॅशन व बोल्डनेसमुळे लोकप्रिय असलेली अभिनेत्री दिशा पाटनीहिला खुशबू नावाची मोठी बहीण आहे. दिशा फॅशनच्या दुनियेत सक्रिय आहे, तर तिची बहीण खुशबू पाटनी ही भारतीय सैन्यात अधिकारी राहिली आहे. स्वातंत्र्यदिन अवघ्या दोन आठवड्यांवर आहे, अशातच खुशबूने तिचे काही जुने फोटो शेअर केले आहेत. भारतीय सैन्यात लेफ्टनंट राहिलेली खुशबू आता न्यूट्रिशनिस्ट, फिटनेस ट्रेनर व टॅरो कार्ड रीडर आहे. ती इन्स्टाग्रामवर लोकांना फिटने टिप्स देते. याशिवाय ती उत्तम डान्सही करते. खुशबू सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. तिचे इन्स्टाग्रामवर जवळपास सात लाख फॉलोअर्स आहेत. खुशबू दिसायला बहीण दिशासाखीच सुंदर आहे.खुशबूने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर १० फोटो शेअर केले आहेत. हे सर्व फोटो ती भारतीय सैन्यात होती तेव्हाचे आहेत. तिने या फोटोंना भावनिक कॅप्शन दिलं आहे. "ऑगस्ट महिना आल्यावर माझ्या हृदयाची धडधड जास्त वाढते. माझे डोळे नेहमीच माझे माझ्या देशावर असलेले प्रेम दर्शवतात. का, ते तुम्हाला माहितीये का? कारण आम्ही आतापासूनच स्वातंत्र्य दिन साजरा करण्यास सुरुवात केली आहे! माझ्या सर्व महिला अधिकाऱ्यांना खूप खूप प्रेम," असं खुशबूने कॅप्शनमध्ये लिहिलं आहे.खुशबूने ती सैन्यात असतानाचे काही फोटो शेअर केले आहेत. यातील काही फोटो वसतीगृहातील आहेत, तर काही ट्रेनिंगचे आहेत. काही फोटोंमध्ये खुशबू लष्करी गणवेशात दिसत आहे. तिचे हे फोटो पाहून चाहते लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. 'सैन्यात येण्यासाठी इच्छुक उमेदवारांसाठी हे फोटो खूप प्रेरणादायी आहेत,' अशी कमेंट एका युजरने केली आहे.'तरुण पिढीसाठी खरी प्रेरणा,' 'किती सुंदर प्रवास! हे फोटो पाहून मी थोडी भावुक झाले, पण त्याचबरोबर आम्हाला तुझा अभिमान वाटतो,' 'तुमच्या सारख्या धाडसी मुलींची आपल्या देशाला गरज आहे,' 'तुझ्याकडे सर्वकाही असूनही तू देशभक्तीचा मार्ग निवडलास. आम्हाला तुझा अभिमान आहे,' अशा कमेंट या फोटोंवर चाहत्यांनी केल्या आहेत.



# डाव्यांची लायकी काय आहे

बॉलीवूड अभिनेते व लेखक पीयूष मिश्रा यांनी नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'जेएनयू' (जहांगीर नॅशनल युनिव्हर्सिटी) सिनेमात काम केल्याबद्दल बिनशर्त माफी मागितली आहे. 'जेएनयू' हा एक वादग्रस्त चित्रपट होता, हा प्रोपगंडा सिनेमा असल्याची टीकाही समीक्षकांनी केली होती. कम्युनिस्ट लोकांबद्दल द्वेष असल्यामुळे संपूर्ण स्क्रिप्ट न वाचता ही भूमिका स्वीकारण्याचं मिश्रा यांनी सांगितलं. हा चित्रपट करणे ही चूक होती, असंही त्यांनी म्हटलं आहे.'दैनिक जागरण'ला दिलेल्या मुलाखतीत पीयूष मिश्रा यांना त्यांच्या कम्युनिस्ट भूतकाळाबद्दल विचारण्यात आलं. "त्यावेळी मला त्यापेक्षा चांगलं काही माहीत नव्हतं. मी तेव्हाही कम्युनिस्ट विचारसरणीचं समर्थन करत नव्हतो, पण त्याकाळी माझ्याकडे स्वतःचे कोणतेही व्यक्तिमत्व नव्हते, त्यामुळे आजूबाजूच्या लोकांचे अनुसरण करण्याशिवाय पर्याय नव्हता," असं ते म्हणाले.

# जुनैद खानमुळे चर्चेत



बॉलीवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट म्हणून ओळखला जाणारा अभिनेता म्हणजे आमिर खान होय. तो सतत कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असतो. गेल्या काही दिवसांपासून अभिनेता मुलगा जुनैद खानमुळे मोठ्या चर्चेत होता. जुनैद खानने नुकतेच 'महाराज' या चित्रपटातून पदार्पण केले आहे. आता आमिर खानने एका मुलाखतीत, जुनैदच्या पदार्पणाबाबत खूप तणावात होतो, असे वक्तव्य केले आहे.'न्यूज १८' बरोबर संवाद साधताना आमिर खानने जुनैदच्या पदार्पणाबाबत वक्तव्य केले आहे. तो म्हणतो की, जेव्हा जुनैद बॉलीवूडमध्ये पदार्पण करत होता. त्यावेळी मी खूप तणावात होतो. लोकांना त्याचे काम आवडेल की नाही, माहित नव्हते. पण त्याने स्वत:वर खूप मेहनत घेतली आहे. त्याने कधीच माझ्याकडून कसलीच मदत घेतली नाही. मला खूप गर्व वाटतो आणि आनंद होतो की, सगळ्या गोष्टी त्याने स्वत:च्या मेहनतीवर केल्या, सगळ्यांना ते माहित आहे. आणखी एका मुलाखतीत आमिरने जुनैदचे कौतुक करताना म्हटले आहे की, त्याने सुरुवातीलाच वेगळे कथानक निवडले, लोकांना त्याची भूमिका आवडली. लोक ज्याप्रकारे त्याला पाठिंबा देत आहेत, ही खरंच चांगली सुरुवात आहे. त्याने माझ्याशिवाय सगळ्या गोष्टी केल्या आहेत. हा चित्रपट मिळवण्यासाठीदेखील त्याने स्क्रीन टेस्ट दिली आहे. जुनैद खानने काही दिवसांपूर्वी सिद्धार्थ कननला दिलेल्या मुलाखतीत आपल्या कुटुंबाविषयी भाष्य केले होते.

# लाडक्या लेकीसह मुंबईत परतील ऐश्वर्या राय-बच्चन

गेल्या काही दिवसांपासून ऐश्वर्या राय-बच्चन खूप चर्चेत आली आहे. अनंत अंबानी व राधिका मर्चंटच्या लग्नसोहळ्याला बच्चन कुटुंबियांबरोबर ऐश्वर्या उपस्थितीत राहिली नव्हती. लाडकी लेक आराध्याबरोबर ऐश्वर्या अनंत-राधिकाच्या लग्नाला पोहोचली होती. तेव्हापासून ऐश्वर्या राय-बच्चन आणि अभिषेक बच्चन यांच्यातील घटस्फोटाच्या चर्चांना उधाण आलं आहे. अशातच ऐश्वर्या राय-बच्चन ( AISHWARYA RAI BACHCHAN ) लेक आराध्याबरोबर अमेरिकेत सुट्टी एन्जॉय करण्यासाठी गेली होती. अमेरिकेतील ऐश्वर्याचे बरेच फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. त्यानंतर आता ऐश्वर्या लेकीसह अमेरिकेहून सुट्टी एन्जॉय करून मुंबईत परतील आहे. यासंबंधित ऐश्वर्या व आराध्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.सेलिब्रिटी फोटोग्राफर 'विरल भयानी'च्या इन्स्टाग्राम पेजवर ऐश्वर्या राय-बच्चन ( AISHWARYA RAI BACHCHAN ) आणि आराध्या बच्चन यांचा मुंबई विमानतळावरील व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओत, ऐश्वर्या काळ्या रंगाच्या आऊटफिटमध्ये दिसत असून आराध्या फिकट जांभळ्या रंगाचा टॉप आणि काळ्या पॅन्टवर पाहायला मिळत आहे. नेहमीप्रमाणे ऐश्वर्या लेकीची काळजी घेत तिला गाडीत बसवताना दिसत आहे. एवढंच नव्हे तर यावेळी ऐश्वर्याने पापाराझींशी संवाद साधला. त्यांना गुड मॉर्निंग म्हणाली. ऐश्वर्या ( AISHWARYA RAI BACHCHAN ) व आराध्याचा हा मुंबई विमानतळावरील व्हिडीओ सध्या चांगलाच चर्चेत आला आहे. नेटकऱ्यांनी व्हिडीओवर भरभरून प्रतिक्रिया दिल्या आहेत. काही नेटकऱ्यांनी ऐश्वर्या व आराध्याच्या लूकविषयी प्रतिक्रिया दिली आहे. "आराध्या अभिषेक बच्चन सारखी हुबेहूब दिसते", असं म्हणतं आहेत. तसंच काही नेटकऱ्यांनी "आराध्या शाळेत जात नाही का? अभ्यास करते की नाही?

# मुशफिकुरने मोडला सचिनचा रेकॉर्ड!

## असा कारनामा करणारा ठरला पहिलाच फलंदाज

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बांगलादेशचा संघ सध्या श्रीलंका दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये २ कसोटी सामन्यांची मालिका रंगणार आहे. या मालिकेतील पहिला सामना गॉलच्या मैदानावर सुरू आहे. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या बांगलादेशच्या फलंदाजांनी चांगलाच धुमाकूळ घातला आहे. बांगलादेशकडून फलंदाजी करताना कर्णधार नजमूल हुसेन शान्तो आणि संघातील अनुभवी फलंदाज मुशफिकुर रहीमने दमदार शतकी खेळी केली. या खेळीसह मुशफिकुर रहीमने एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.**



या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशची सलामी जोडी स्वस्तात माघारी परतली. ज्यावेळी मुशफिकुर रहीम फलंदाजीला आला, त्यावेळी बांगलादेशची धावसंख्या ३ गडी बाद ४५ इतकी होती. त्यानंतर रहीम आणि शान्तोने मिळून बांगलादेशचा डाव सांभाळला. दोघांनी मिळून १४७ धावांची भागीदारी करून संघाची धावसंख्या पहिल्या दिवसाअखेर ३ गडी बाद २९२ वर पोहोचवली. पहिल्या दिवशी शान्तो १३६ तर रहीम १०५ धावांवर माघारी परतला.यासह मुशफिकुर रहीमच्या नावे मोठ्या रेकॉर्डची नोंद झाली आहे. मुशफिकुर रहीम हा कसोटी क्रिकेटमध्ये श्रीलंकेत फलंदाजी करताना शतक झळकावणारा सर्वात वरिष्ठ खेळाडू बनला आहे. त्याने वयाच्या ३८ व्या (३८ वर्षे ३९ दिवस) वर्षी शतक झळकावलं आहे. या रेकॉर्डमध्ये त्याने पाकिस्तानचा माजी फलंदाज युनूस खानला मागे सोडलं आहे. युनूस खानने वयाच्या ३७ व्या (३७ वर्ष, २१६ दिवस) वर्षी शतक पूर्ण केलं होतं. तर भारताचा मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने कोलंबोत फलंदाजी करताना वयाच्या ३७ व्या (३७ वर्ष ९३ दिवस) शतक झळकावलं होतं.या सामन्याबद्दल बोलायचं झालं, तर गॉलच्या मैदानावर सुरू असलेल्या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या डावात बांगलादेशच्या सलामी जोडीला हवी तशी सुरुवात करून देता आली नाही.

सलामीला आलेला शदनम इस्लाम अवघ्या १४ धावांवर माघारी परतला. तर अनमूल हकला खातंही उघडता आलं नाही.तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेला मोमिनूल हकने २९ धावांची खेळी केली. कर्णधार नजमूल हुसेन शान्तोने १४८ धावांची खेळी केली. तर मुशफिकुर रहीमने १५० हून अधिक धावांची खेळी करत संघाची धावसंख्या ४०० पार पोहोचवली आहे.या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशची सलामी जोडी स्वस्तात माघारी परतली. ज्यावेळी मुशफिकुर रहीम फलंदाजीला आला, त्यावेळी बांगलादेशची धावसंख्या ३ गडी बाद ४५ इतकी होती. त्यानंतर रहीम आणि शान्तोने मिळून बांगलादेशचा डाव सांभाळला. दोघांनी मिळून १४७ धावांची भागीदारी करून संघाची धावसंख्या पहिल्या दिवसाअखेर ३ गडी बाद २९२ वर पोहोचवली. पहिल्या दिवशी शान्तो १३६ तर रहीम १०५ धावांवर माघारी परतला.मुशफिकुर रहीम हा कसोटी क्रिकेटमध्ये श्रीलंकेत फलंदाजी करताना शतक झळकावणारा सर्वात वरिष्ठ खेळाडू बनला आहे.

### मुशफिकुर रहीमने रचला इतिहास

वयाच्या ३८ व्या (३८ वर्षे ३९ दिवस) वर्षी शतक झळकावलं आहे. या रेकॉर्डमध्ये त्याने पाकिस्तानचा माजी फलंदाज युनूस खानला मागे सोडलं आहे. युनूस खानने वयाच्या ३७ व्या (३७ वर्ष, २१६ दिवस) वर्षी शतक पूर्ण केलं होतं. तर भारताचा मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने कोलंबोत फलंदाजी करताना वयाच्या ३७ व्या (३७ वर्ष ९३ दिवस) शतक झळकावलं होतं.या सामन्याबद्दल बोलायचं झालं, तर गॉलच्या मैदानावर सुरू असलेल्या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या डावात बांगलादेशच्या सलामी जोडीला हवी तशी सुरुवात करून देता आली नाही. सलामीला आलेला शदनम इस्लाम अवघ्या १४ धावांवर माघारी परतला. तर अनमूल हकला खातंही उघडता आलं नाही.

---

# पंजाबचा फलंदाज अमेरिकेत गरजला!

## 13 षटकारांसह शतक अन् रोहितच्या रेकॉर्डची बरोबरी

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अमेरिकेत मेजर लीग क्रिकेट २०२५ स्पर्धेला सुरूवात झाली आहे. या स्पर्धेत आतापर्यंत एकापेक्षा एक रोमांचक सामने पाहायला मिळाले आहेत. दरम्यान ऑस्ट्रेलियाचा विस्फोटक फलंदाज ग्लेन मॅक्सवेलने षटकारांचा पाऊस पाडत ४८ चेंडूत दमदार शतक झळकावलं आहे.**

या शतकी खेळीसह मॅक्सवेलने रोहित शर्माच्या रेकॉर्डची बरोबरी केली आहे. रोहित शर्माच्या नावे टी-२० क्रिकेटमध्ये ८ शतकं झळकावण्याची नोंद आहे. हे शतक पूर्ण करताच त्याने ऑस्ट्रेलियाचे माजी फलंदाज आरोन फिंच आणि डेव्हिड वॉर्नरच्या रेकॉर्डची बरोबरी केली आहे. वॉशिंग्टन फ्रिडम संघाकडून फलंदाजी करताना ग्लेन मॅक्सवेलने सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करताना अवघ्या ४९ चेंडूत १०६ धावांची तुफानी खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने २ चौकार आणि १३ षटकार खेचले. या खेळीच्या बळावर त्याने संघाची धावसंख्या ५ गडी बाद २०८ धावांपर्यंत पोहोचवली. ग्लेन मॅक्सवेलसह मिचेन ओवेनने सलामीला फलंदाजी करताना ३२ धावांची खेळी केली. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेला लॉस एंजिलिस नाईट रायडर्सचा डाव अवघ्या ९५



धावांवर आटोपला.या सामन्यात फलंदाजी करताना ग्लेन मॅक्सवेलने सुरूवातीच्या १५ चेंडूत अवघ्या ११ धावा केल्या होत्या. त्यानंतर पुढील ३४ चेंडूत त्याने ९५ धावा केल्या. या खेळीच्या बळावर त्याने आपल्या संघाची धावसंख्या २०० पार पोहोचवली. लॉस एंजिलिस नाईट रायडर्स संघाला हा सामना जिंकण्यासाठी २०९ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना लॉस एंजिलिस नाईट रायडर्स संघाचा संपूर्ण डाव अवघ्या ९५ धावांवर आटोपला. फलंदाजीत ग्लेन मॅक्सवेल चमकल्यानंतर गोलंदाजीत डावखुऱ्या हाताचा वेगवान गोलंदाज सौरभ नेत्रावळकर चमकला. त्याने गोलंदाजीत ३.३ षटक गोलंदाजी करत अवघ्या ६ धावा खर्च करत २ गडी बाद केले. यादरम्यान त्याने १ निर्धाव षटक टाकलं. हा सामना वॉशिंग्टन फ्रिडम संघाने ११३ धावांनी आपल्या नावावर केला. या शतकी खेळीसह मॅक्सवेलने रोहित शर्माच्या रेकॉर्डची बरोबरी केली आहे. रोहित शर्माच्या नावे टी-२० क्रिकेटमध्ये ८ शतकं झळकावण्याची नोंद आहे. हे शतक पूर्ण करताच त्याने ऑस्ट्रेलियाचे माजी फलंदाज आरोन फिंच आणि डेव्हिड वॉर्नरच्या रेकॉर्डची बरोबरी केली आहे. वॉशिंग्टन फ्रिडम संघाकडून फलंदाजी करताना ग्लेन मॅक्सवेलने सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करताना अवघ्या ४९ चेंडूत १०६ धावांची तुफानी खेळी केली.

### 34 चेंडूत त्याने 95 धावा

या खेळीच्या बळावर त्याने संघाची धावसंख्या ५ गडी बाद २०८ धावांपर्यंत पोहोचवली. ग्लेन मॅक्सवेलसह मिचेन ओवेनने सलामीला फलंदाजी करताना ३२ धावांची खेळी केली. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेला लॉस एंजिलिस नाईट रायडर्सचा डाव अवघ्या ९५ धावांवर आटोपला.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। गुरुवार ।
। दि. 19 जून 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

CERTIFICATION COURSE BY MORAYA SHIKSHAN SANSTHA, CHINCHWAD



शिक्षणाबरोबरच सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व घडविणारी शाळा

2025-26 ADMISSIONS OPEN

प्रज्वलितो ज्ञानमयो प्रदीपः

"यत् भावो – तत् भवति"

# मोरया शिक्षण संस्था. चिंचवड
# डिप्लोमा इन मॉन्टेसरी आणि नर्सरी शिक्षक प्रशिक्षण









* राष्ट्रीय स्तरावर वैध प्रमाणपत्र
* प्रात्यक्षिकवर भर,
* ग्रंथालय सुविधा
* अध्यापन शास्त्राबद्दलची माहिती
* बाल मानसशास्त्र व पोषण आणि खूप काही..

* शुल्क: १६,०००/- (२ हप्त्यांसह)
* १ सेमिस्टर कोर्स
* अभ्यासक्रम कालावधी: १५ जून २०२५ ते १५ डिसेंबर २०२५
* वेळ : सकाळी १० ते दुपारी २

प्लॉट क्र. 13, मोरया कॉलनी, सुदर्शन नगर, गोलांडे राम मंदिरासमोर, चिंचवड, पुणे 33

संपर्क
सुचित्रा आपटे - ९३२५१३२४०२
भाग्यश्री पंडित - ८०८७७०६१००


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292